# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रशासकीय सेवकांच्या भरती संदर्भातील महत्त्वाच्या सूचना

सोलापूर विद्यापीठात रिक्त असलेल्या नियमित वर्ग ३ व ४ संवर्गातील शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून दि.२१/०४/२०१२, दि.०७/०५/२०१२, दि.०४/०६/२०१२ व दि.०२/०६/२०१५ अन्वये जाहिरात प्रसिध्द करुन आवेदनपत्र मागविण्यात आलेली आहेत. सदर जाहिरातीतील सर्वच पदांच्या भरती प्रक्रिये संदर्भातील महत्त्वाच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनिहाय परीक्षेचे वर्गीकरण |
|---|---|
| १) | **सांख्यिकी सहायक** - या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ६० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |
| २) | **भांडारपाल** - या पदासाठी २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे १०० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. |
| ३) | **लघुटंकलेखक** - या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ६० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |
| ४) | **प्रयोगशाळा सहायक** - या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ६० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |
| ५) | **कनिष्ठ लिपिक** - या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ६० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |
| ६) | **रेकॉर्ड- किपर-नि-लिपिक** - या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ६० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |
| ७) | **प्रयोगशाळा परिचर** - या पदासाठी १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ५० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. |
| ८) | **ग्रंथालय परिचर** - या पदासाठी १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ५० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. |
| ९) | **शिपाई** - या पदासाठी १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ५० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. |
| १०) | **वाहन चालक** - या पदासाठी ८० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ४० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. तसेच २० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेण्यात येईल. |

गट क संवर्गाच्या लेखी परीक्षेसाठी विषयवार प्रश्न, गुण व परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | पदनाम | लेखी परीक्षेचे एकूण गुण | लेखी परीक्षेच्या गुणांची विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी विषयासंबंधित प्रश्न | इंग्रजी विषयासंबंधित प्रश्न | सामान्य ज्ञान विषयासंबंधित प्रश्न | बैध्दिक चाचणी संबंधित प्रश्न |
| १) | सांख्यिकी सहायक | १२० गुण (प्रश्न- ६०) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) |
| २) | भांडारपाल | २०० गुण (प्रश्न-१००) | ५० गुण (प्रश्न -२५) | ५० गुण (प्रश्न -२५) | ५० गुण (प्रश्न -२५) | ५० गुण (प्रश्न -२५) |
| ३) | लघुटंकलेखक | १२० गुण (प्रश्न- ६०) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) |
| ४) | प्रयोगशाळा सहायक | १२० गुण (प्रश्न- ६०) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) |
| ५) | कनिष्ठ लिपिक | १२० गुण (प्रश्न- ६०) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) |
| ६) | रेकॉर्ड किपर-नि-लिपिक | १२० गुण (प्रश्न- ६०) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) | ३० गुण (प्रश्न -१५) |

टीप : उपरोक्त पदापैकी ज्या पदांची शैक्षणिक अर्हता पदवी आहे, त्या पदांच्या परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. तर ज्या पदांची शैक्षणिक अर्हता पदव्युत्तर पदवी अशी आहे, त्या पदांच्या परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.

वरील दोन्ही प्रकारासाठी मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील.

गट ड संवर्गाच्या लेखी परीक्षेसाठी विषयवार प्रश्न, गुण व परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | पदनाम | लेखी परीक्षेचे एकूण गुण | लेखी परीक्षेच्या गुणांची विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी विषयासंबंधित प्रश्न | इंग्रजी विषयासंबंधित प्रश्न | सामान्य ज्ञान विषयासंबंधित प्रश्न | अंकगणित विषयासंबंधित प्रश्न |
| ७) | प्रयोगशाळा परिचर | १०० गुण (प्रश्न- ५०) | २४ गुण (प्रश्न -१२) | २६ गुण (प्रश्न -१३) | २६ गुण (प्रश्न -१३) | २४ गुण (प्रश्न -१२) |
| ८) | ग्रंथालय परिचर | १०० गुण (प्रश्न- ५०) | २४ गुण (प्रश्न -१२) | २६ गुण (प्रश्न -१३) | २६ गुण (प्रश्न -१३) | २४ गुण (प्रश्न -१२) |
| ९) | शिपाई | १०० गुण (प्रश्न- ५०) | २४ गुण (प्रश्न -१२) | २६ गुण (प्रश्न -१३) | २६ गुण (प्रश्न -१३) | २४ गुण (प्रश्न -१२) |
| १०) | वाहन चालक | ८० गुण (प्रश्न- ४०) | २० गुण (प्रश्न -१०) | २० गुण (प्रश्न -१०) | २० गुण (प्रश्न -१०) | २० गुण (प्रश्न -१०) |

टीप : अ.क्र. ७ व ८ वरील पदाकरिता परीक्षेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा इयत्ता १० वी च्या दर्जाच्या समान राहील.

अ.क्र. ९ व १० वरील पदाकरिता परीक्षेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी) दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा इयत्ता ७ वी च्या दर्जाच्या समान राहील.

## सर्वसाधारण सूचना

| | |
|---|---|
| १. | विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या दि.२१/०४/२०१२, दि.०७/०५/२०१२ व दि.०४/०६/२०१२ च्या जाहिरातीस अनुसरुन विविध पदांसाठी आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांची आवेदनपत्रं सध्या चालू करण्यात आलेल्या पदे भरतीसाठी विचारात घेण्यात येणार आहेत. तथापि, त्या सर्व उमेदवारांना दिनांक ०२/०६/२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातील शैक्षणिक अर्हता, अनुभव व आरक्षण लागू राहील.<br>दिनांक ०२/०६/२०१५ च्या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे ज्या उमेदवारांनी अधिकच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवांची कागदपत्रे दि.२०/०६/२०१५ पर्यंत विद्यापीठाकडे सादर केलेली आहेत, त्या उमेदवारांचा लेखी परीक्षा/व्यावसायिक चाचणीसाठी विचार करण्यात येईल. |
| २. | दि.२१/०४/२०१२, दि.०७/०५/२०१२, दि.०४/०६/२०१२ व दिनांक ०२/०६/२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरुन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांसाठी त्या त्या जाहिरातीनुसार आवेदनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या तारखेस किमान व कमाल वयोमर्यादेची गणना करण्यात येईल. शासकीय, निमशासकीय, विद्यापीठं व अनुदानित महाविद्यालयाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही. |
| ३. | जाहिरातीतील विविध पदासाठी पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्या याद्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ४. | लेखी परीक्षा विद्यापीठ परिसरात/संलग्नित महाविद्यालयात घेण्यात येतील. |
| ५. | लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे. |
| ६. | उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत व व्यावसायिक चाचणीत प्रत्येकी किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. (लेखी परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त केल्याशिवाय व्यावसायिक चाचणीस बसता येणार नाही.) |
| ७. | उमेदवारांना समान गुण मिळाल्यास (लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी मिळून) खालील क्रमानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.<br>१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार ; त्यानंतर<br>२) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्ती जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९०- पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने ; त्यानंतर,<br>३) शारीरिक दृष्टया अपंग असलेले उमेदवार ; त्यानंतर<br>४) माजी सैनिक असलेले उमेदवार ; त्यानंतर |

| | |
|---|---|
| | ५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार ; त्यानंतर<br>६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)<br>वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल. |
| ८. | उमेदवाराने नियुक्ती नंतर किमान तीन वर्षे सेवा करणे बंधनकारक आहे. तत्पूर्वी उमेदवारास सेवा सोडून जावयाचे असल्यास, झालेल्या सेवा कालावधीतील प्राप्त वित्त लब्धी (पगार) किंवा एक लक्ष रुपये यापैकी न्युनतम रक्कम विद्यापीठाकडे जमा करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे संबंधित उमेदवारास रु.१००/- च्या बाँडवर हमी पत्र द्यावे लागेल. या व्यतिरिक्त महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील तरतूदीही लागू राहतील. |
| ९. | माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| १०. | परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी अथवा इतर कोणतेही ईलेक्ट्रॉनिक उपकरण आणता येणार नाही. जर परीक्षार्थींनी भ्रमणध्वनी अथवा ईलेक्ट्रॉनिक उपकरण परीक्षा केंद्रावर आणले तर ते स्वत:च्या जबाबदारीवर परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवावे लागेल. परीक्षा केंद्रात अशी उपकरणे आढळून आल्यास ती त्वरित जप्त करण्यात येतील व कुठल्याही परिस्थितीत उमेदवारांना परत केली जाणार नाही. अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. |
| ११. | उमेदवारांनी त्यांचे प्रवेश पत्र विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Home page मध्ये Employment Opportunities⟶Administrative Staff (Non-Teaching) या लिंकवरुन डाऊनलोड करुन घ्यावेत. या संदर्भात काही तांत्रिक अडचण आल्यास ०२१७-२७४४७७१ (Extn. १०७, १८२) या दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा. |
| १२. | उमेदवारांना प्रवेश पत्राशिवाय परीक्षा हॉल मध्ये प्रवेश दिला जाणार नाही. |
| १३. | उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेपूर्वी अर्धातास अगोदर उपस्थित राहावे. |
| १४. | रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालयाकडून) व एकात्मिक आदिवासी विकास कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या याद्यामधील उमेदवारांना पात्र ठरविण्यात आलेल्या आहे. अशा उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेपूर्वी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह किमान एक तास अगोदर उपस्थित राहावे. त्यांच्यासाठी परीक्षा केंद्रावर आवेदनपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. ती त्यांनी संपूर्णत: भरुन त्यावर स्वत:चा फोटो चिटकवून शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती सोबत जोडाव्यात. |
| १५. | परीक्षा सुरु झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षा हॉल मध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच परीक्षा सुरु झाल्यापासून परीक्षा संपेपर्यंत उमेदवारांना कोणत्याही सबबीवर परीक्षा हॉल मधून बाहेर जाता येणार नाही. |

| | |
|---|---|
| १६. | बरोबर उत्तरांना गुण दिले जातील. चूकीच्या उत्तराबद्दल गुण वजा केले जाणार नाहीत. |
| १७. | आपणास परीक्षेचे प्रवेश पत्र दिले याचा अर्थ आपली उमेदवारी स्वीकारली असा होत नाही, आपण अपात्र असल्याचे कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास त्या क्षणाला आपली उमेदवारी आपोआप रद्द होईल. |
| १८. | लेखी परीक्षेसाठी अथवा व्यावसायिक चाचणीसाठी येण्या-जाण्याचा प्रवास खर्च किंवा कोणताही भत्ता दिला जाणार नाही. |
| १९. | एकाच्या नावार दुसरा उमेदवार लेखी परीक्षा/व्यावसायिक चाचणी देत असल्याचे आढळून आल्यास त्यास त्वरित अपात्र ठरविण्यात येईल आणि त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| २०. | उमेदवाराने उत्तर पत्रिकेवर त्याचा बैठक क्रमांक व्यवस्थित रित्या लिहावा/लंब गोल करावा. अन्यथा आपली उत्तर पत्रिका रद्द समजण्यात येईल. |
| २१. | उमेदवारांनी लेखी परीक्षा / व्यावसायिक चाचणीसाठी येताना आधार कार्ड, वाहन चालवण्याचा परवाना, पासपोर्ट किंवा पॅन कार्ड यापैकी, कुठलेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. |